# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ११

सभावृत्तांत

दिनांक ०४/१२/२०१५ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे डिसेंबर २०१५ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०४/१२/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. अरुण मदन टाक | सभापती |
| २. | मा. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| ३. | मा. श्रीमती विमल रमेश काळे | सदस्या |
| ४. | मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ५. | मा. श्री.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ६. | मा. श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ७. | मा. श्रीमती वैशाली राहुल जवळकर | सदस्या |
| ८. | मा. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. शिवाजी तुकाराम पाडुळे

२. मा. श्री. सागर खंडू कोकणे

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. मालोजीराव पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा मा. विनय ओहोळ, मा. एल.बी. जाधव, उपअभियंता स्थापत्य, मा. राजेंद्र जावळे, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. श्रीमती पाठक ए.ए. उपअभियंता, झोनिपू, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, , मा.गोसावी, उद्यान अधिक्षक (मा. मुख्य उद्यान अधिक्षक यांचे वतीने) मा. अजय जाधव, मा.एस.एस. गायकवाड,मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. निलेश दाते, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. आर.बी. जगताप, मा. संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता,नगररचना मा. रोकडे जयवंत, मा. वरकोडे ए.एम. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. बी.एम. मुलाणी, शाखा अभियंता, जलनि:सारण, मा.डी.डी.सटाले,उद्यान सहाय्यक, मा. मोहन कदम, मा. एच. पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या काकाजास सुरुवात केली.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता मिळावी.

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १ :** प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव स.नं. २३/३ येथे साधारण २०० नागरीकांची वस्ती असुन या ठिकाणी जास्तीत जास्त नवले कुटुंबिय वास्तव्य करत आहे. सदर स.नं. हा नवले

परिवाराच्या वहिवाटीचा असल्यामुळे ते या परिसरातील स्थानिक रहिवाशी असुन सदर परिसरास नवले कॉलनी असे नामकरण करावे.

**विषय क्र. २ :** प्रभाग क्र. ५७ या भागात १८ मीटर रस्ते परिसरातील अनेक भागांना उदा. सांगवी नवी सांगवी दापोडी कासारवाडी यांना जोडण्याची काम करत असुन या रस्त्यांवर दिवसेंदिवस वाहतुक मोठया प्रमाणावर वाढत आहे. ही वाढती वाहतुक लक्षात घेता या १८ मीटर रस्त्यावर अनेक खाजगी वाहनांचे पार्कींगचे प्रमाण वाढत आहे. या वाहनांमुळे या रस्त्यावर वारंवार वाहतुक कोंडी होत असते. परिणामी अपघातांचे प्रमाण वाढत आहे. तेव्हा वारंवार होणारी वाहतुक कोंडी व अपघात टाळण्यासाठी खालील चौकात चारही रस्त्यावर ५० मीटर अंतरावर नो पार्किंग फलक लावण्यात यावेत.

१) कृष्णा बाजार चौक, २) रामकृष्ण मंगल कार्यालय चौक, ३)काटे पुरम चौक

तसेच खालील ठिकाणी पी १ व पी २ चे फलक लावण्यात यावेत

१)रामकृष्ण मंगल कार्यालय ते काटे पुरम चौक २) एम.एस. काटे चौक ते कृष्णा बाजार चौक

सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक १८/०९ /२०१५ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. २९ — विषय क्र. १

दिनांक : ०४ /१२/२०१५ — विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप — अनुमोदक : मा.रामदास बोकड

संदर्भ : मा. नगरसदस्य श्री. राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दिनांक ०४/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव स.नं. २३/३ येथे साधारण २०० नागरीकांची वस्ती असुन या ठिकाणी जास्तीत जास्त नवले कुटुंबिय वास्तव्य करत आहे. सदर स.नं. हा नवले परिवाराच्या वहिवाटीचा असल्यामुळे ते या परिसरातील स्थानिक रहिवाशी असुन सदर परिसरास नवले कॉलनी असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

--------------------

ठराव क्र. ३० — विषय क्र. २

दिनांक : ०४ /१२/२०१५ — विभाग : स्थापत्य विभाग

सुचक : मा.राजेंद्र गणपतराव जगताप — अनुमोदक : मा.रामदास बोकड

संदर्भ : मा. नगरसदस्य श्री. राजेंद्र गणपतराव जगताप यांचेकडील दिनांक ०४/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५७ या भागात १८ मीटर रस्ते परिसरातील अनेक भागांना उदा. सांगवी नवी सांगवी दापोडी कासारवाडी यांना जोडण्याची काम करत असुन या रस्त्यांवर दिवसेंदिवस वाहतुक मोठया प्रमाणावर वाढत आहे. ही वाढती वाहतुक लक्षात घेता या १८ मीटर रस्त्यावर अनेक खाजगी वाहनांचे पार्कींगचे प्रमाण वाढत आहे. या वाहनांमुळे या रस्त्यावर वारंवार वाहतुक कोंडी होत असते. परिणामी अपघातांचे प्रमाण वाढत आहे. तेव्हा वारंवार होणारी वाहतुक कोंडी व अपघात टाळण्यासाठी १) कृष्णा बाजार चौक, २) रामकृष्ण मंगल कार्यालय चौक, ३)काटे पुरम चौक या चौकात चारही रस्त्यावर ५० मीटर अंतरावर नो पार्किंग फलक लावणे तसेच १)रामकृष्ण मंगल कार्यालय ते काटे पुरम चौक २) एम.एस. काटे चौक ते कृष्णा बाजार चौक या ठिकाणी पी १ व पी २ चे फलक लावण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

--------------------

मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सन्मा. सदस्यांनी खालीलप्रमाणे विविध विषयांवर त्यांचे मत व्यक्त केले.

मा. राजेंद्र जगताप :

कृष्णा चौक, काटे पुरम चौक, पिंपळे गुरव परिसरातील हातगाडीवाले, पथारीवाले खाजगी टेंपोधारक व जाहीरातींचे फ्लेक्स यांचे अतिक्रमण काढणेबाबतची कार्यवाही तीव्र करावी.

मा. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे :- पी१, पी२ समांतर पार्कींगचे बोर्ड लावणेबाबतची मागणी गेल्या तीन महिन्यापासुन प्रलंबित आहे. याबाबत स्थापत्य विभागाकडे तीन महिन्यापूर्वी पत्र दिले आहे. तात्काळ कार्यवाही करावी.

मा. रामदास बोकड :- सुदर्शननगर बीआरटीएसच्या स्ट्रीटलाईट बंद असतात, योग्य नियोजन करण्यात यावे. पुढील बैठकीस महावितरण कंपनीचे अधिका-यांना उपस्थित राहणेबाबत सूचना देणेत याव्यात.

**मा. सभापती** :- सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन सर्व सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे डिसेंबर २०१५ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-
( अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/१४२/२०१५
दिनांक – १६/१२ /२०१५